धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**
तालुक्यातील एका गावात १६ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी (नाव व गाव गोपनीय) ही दि. १ मे २०२६ रोजी रात्री ८ ते १० वाजण्याच्या सुमारास मेडिकलमध्ये औषधे आणण्यासाठी गेली असता, गावातील एका तरुणाने तिला मोटरसायकलवर बसवून नेले व तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

या प्रकरणी पीडितेच्या आईने दि.२ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ३५१(२) तसेच पोस्को कायदा कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### ‘जयप्रकाश‘च्या विठोबा जाधव याची पीएसआय पदावर निवड

**धाराशिव, दि.४ मे -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील माजी विद्यार्थी विठोबा पांडुरंग जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. जाधव यांनी कठीण परिस्थितीत शिक्षण पूर्ण करत होमगार्ड पदावर सेवा बजावत परिश्रमांच्या जोरावर पीएसआय पद मिळवले. या कार्यक्रमाला रामदास कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, बालाजी कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, धनाजी चव्हाण, पांडुरंग कुंडलिक कोळगे, मारुती कस्पटे, सुरज जाधव, नानासाहेब पवार, शशिकांत कोळगे, शाहूराज मते, राजेंद्र भणगे, निवृत्ती भोईटे, नाना जाधव, लक्ष्मीकांत घोडके, रामराजे जाधव व रुईभर येथील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### चंद्रकांत हगलगुंडे यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार

**अणदूर, दि.४ मे -**
तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना आधार फाउंडेशन व



एसआर २४ न्यूज मीडिया समूह, राहुरी (अहिल्यानगर) यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. गेल्या ३५ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असलेल्या हगलगुंडे यांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून जयमल्हार पत्रकार संघासह विविध संस्थांनी त्यांचा गौरव केला आहे.

### इम्रान मुल्ला यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**कळंब, दि.४ मे -**
येथील युवा सामाजिक कार्यकर्ते इम्रान नजमोद्दीन मुल्ला यांची सकल मुस्लिम युवक संघटनेच्या



जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष अझरुद्दीन सय्यद व मराठवाडा अध्यक्ष दानिश कुरेशी यांच्या मान्यतेने ही निवड जाहीर होताच परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. डिकसळ गावचे रहिवासी व ग्रामपंचायत सदस्य असलेले इम्रान मुल्ला हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून दयावान प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी गरजू व वंचितांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हाभरातून अभिनंदन होत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक सक्षमपणे समाजहिताचे कार्य करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### कळंब येथे बुद्ध पौर्णिमा साजरी

**कळंब, दि.४ मे -**
शहरातील लुंबिनी बौद्ध विहार येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान गौतम बुद्ध जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्रिशरण पंचशील व बुद्ध वंदना घेऊन पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले तसेच खीरदानाचा कार्यक्रमही पार पडला. कार्यक्रमात महिलांचा मोठा सहभाग दिसून आला. विविध मान्यवर व सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी मनीषा बनसोडे, गंगाबाई गायकवाड, नलिनी बनसोडे, अर्चना हौसलमल, चांदणी गायकवाड, लक्ष्मी वाघमारे, सुषमा वाघमारे, प्रीती हौसलमल, माया बनसोडे, मनीषा गायकवाड यांच्यासह आदिंचा सहभाग होता.



### तुळजापूरात इस्कॉनच्या वतीने नगर संकीर्तन उत्साहात

**तुळजापूर, दि.४ मे -**
आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) धाराशिवच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर शहरात 'नगर संकीर्तन' सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कलियुगी नाम संकीर्तन, हेचि मुख्य साधन या सिद्धांतानुसार, जीवाच्या कल्याणासाठी आणि हरिनामाचा प्रचार करण्याच्या पवित्र हेतूने ही श्रीराम फेरी काढण्यात आली. इच्छापूर्ती गणेश मंदिरापासून सुरू झालेली ही अमृतमयी श्रीराम फेरी अयोध्या नगरातून मार्गक्रमण करत महावीर कासार प्रभूजींच्या निवासस्थानी पोहोचली. यावेळी भक्तवृंदांनी श्रील प्रभुपादांच्या शिकवणुकीनुसार संकीर्तनाचा आनंद घेतला.

# तारीख पे तारीख; धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल!


## ▸▸ पीक विमा रखडला... ▸▸ कर्जमाफी अडकली.... ▸▸ खरीप हंगामापूर्वीच शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी....

**विपीन वीर**
**धाराशिव, दि.४ मे -**
जिल्ह्यातील शेतकरी सध्या प्रचंड आर्थिक अडचणीत सापडला असून तारीख पे तारीख या अवस्थेत पीक विम्याची वाट पाहत बसला आहे. २०२० सालचा उर्वरित पीक विमा अद्याप मिळालेला नाही, तर २०२५ च्या संपूर्ण पीक विम्याचा तर काहीच ठावठिकाणा नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

शेतकरी सरकारच्या नावाने टाहो फोडत आहेत. अनेक गावांमध्ये संतप्त शेतकरी आंदोलनाचा इशारा देत आहेत. मात्र या ज्वलंत प्रश्नावर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मात्र गप्प असल्याचे चित्र दिसून येत आहे. निवडणुका संपल्यानंतर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, शेतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. खत, बियाणे, औषधे आणि मजुरीचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडला आहे. त्यातच पीक विमा आणि कर्जमाफीची रक्कम वेळेवर न मिळाल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

सरकारने जाहीर केलेली पीक कर्जमाफी अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. त्यामुळे अनेक शेतकरी अजूनही बँकांचे कर्ज फेडू शकलेले नाहीत. परिणामी, नवीन कर्ज घेण्यासही अडचणी निर्माण




होत आहेत. येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना पुन्हा भांडवल उभे करावे लागणार आहे. मात्र हातात पैसे नसल्याने अनेक शेतकरी खाजगी सावकारांकडे वळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुन्हा सावकारीच्या विळख्यात अडकण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी सांगितले की, सरकार फक्त घोषणा करते, पण प्रत्यक्षात काहीच मिळत नाही. आम्ही कर्ज, विमा आणि खर्चाच्या ओझ्याखाली दबून गेलो आहोत.

**अनेक संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात...**

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा संताप वाढत असून प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन प्रलंबित पीक विमा वितरित करावा, कर्जमाफीची अंमलबजावणी करावी आणि खरीप हंगामासाठी आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जर लवकरात लवकर उपाययोजना केल्या नाहीत, तर धाराशिव जिल्ह्यात शेतकरी आंदोलन भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## नसरापूर घटनेचा तुळजापूरात निषेध; कठोर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मे -**
पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चार वर्षीय बालिकेवरील अत्याचार व हत्येच्या घटनेचा तुळजापूर येथील सकल ब्राह्मण संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणी आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात पीडित बालिकेला तातडीने न्याय मिळावा, प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी करून दोषीवर कठोर कारवाई करावी, तसेच कुटुंबाला मानसिक आधार व संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कडक कायदे करण्याचीही मागणी संघटनेने केली आहे.

## किरकोळ वादातून युवकाची निर्घृण हत्या; तुळजापूर हादरले

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मे -**
किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर एका युवकाच्या निर्घृण हत्येत झाल्याची धक्कादायक घटना शहरात घडली असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, दीपक चौक परिसरात दि.२ मे रोजी मध्यरात्री एसटी कॉलनीत राहणारा कृष्णा अनंत रसाळ (वय १९) याचा अज्ञात व्यक्तीसोबत किरकोळ वाद झाला. सुरुवातीला सामान्य भांडण वाटणारा हा वाद अचानक विकोपाला गेला. संतापाच्या भरात अज्ञात हल्लेखोराने धारदार शस्त्राने कृष्णा रसाळ यांच्या गळ्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडला. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी सोलापूरला हलवण्याचा सल्ला दिला. मात्र मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने दि.३ मे रोजी दुपारी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस तपास सुरू आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या घटनेमुळे तुळजापूर शहरात खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्र दिनी भाटशिरपुरा विद्यालयात गुणवंतांचा सत्कार व सायकल वाटप



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ मे -**
तालुक्यातील भाटशिरपुरा येथील कै. भाई नारायणराव लोमटे माध्यमिक विद्यालयात १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.

मुख्याध्यापक सुरेश टेकाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना निकालपत्रकांचे वितरण करण्यात आले तसेच शालेय बॅग, वह्या व पुस्तके वाटप करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव बाळकृष्ण धस, पंचायत समितीचे माजी विस्तार अधिकारी सुधाकर चौरे, तालुका संरक्षण अधिकारी बालाजी साळुंखे, पर्यवेक्षिका ऋतुजा देशमुख उपस्थित होते. तसेच समाज कल्याण विभाग धाराशिव यांचे सहकार्य लाभले. सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ लोमटे व शंकरराव हुंबे यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन एच.ए. पानढवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन एस. एस. डिकले यांनी मानले.

## अणदूर येथे अंगणवाडी सेविकांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.४ मे -**
पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था, अणदूर यांच्या वतीने अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांच्या सेवा निवृत्ती निमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दीर्घकाळ सेवा बजावलेल्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी सहाय्यक दीपाली संजय गवळी या होत्या. संस्थेच्या सचिव कु. बाबई लक्ष्मण चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सुजाता विठोबा मुकरे, सृबाई गोविंद बनसोडे व कांताबाई जगन्नाथ कांबळे या तीन अंगणवाडी कार्यकर्तींचा शाल, श्रीफळ, साडी-चोळी व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या दीर्घकालीन सेवेला मान्यता देत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंजली नागेश चव्हाण, पुष्पा चव्हाण, वैजयंती गोवे, शिंदूबाई ढवळे, विशाखा गायकवाड, श्रीदेवी कर्पे, विजया कंदले, स्वाती कंदले, वैशाली जाधव, अंजली जाधव, संतोषी जाधव, सुषमा मातोळे, साधना बोर्डे, आशा बोर्डे व आशा गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला स्थानिक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑनलाईनच्या युगातही एसटीत सुट्ट्या पैशांवरून वाद

### प्रवासी-वाहकांमध्ये तणाव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**
राज्यात डिजिटल व्यवहारांचा प्रसार झपाट्याने वाढत असतानाही एसटी बस प्रवासात सुट्ट्या पैशांचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. तिकीट दरवाढीनंतर हा प्रश्न अधिक तीव्र झाला असून, एक-दोन रुपयांवरून प्रवासी आणि वाहकांमध्ये रोजच वाद होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

एसटी प्रवासादरम्यान तिकीट दर अनेकदा अपूर्ण आकड्यांमध्ये (उदा. १२, ३१, ४२ रुपये) असल्यामुळे प्रवाशांकडे नेमकी रक्कम नसते. अनेक प्रवासी १००, २०० किंवा ५०० रुपयांच्या नोटा देतात; मात्र वाहकांकडे सुट्टे पैसे अपुरे असल्याने नंतर देतो, सुट्टे नाहीत अशा कारणांमुळे वाद निर्माण होतात.

डिजिटल इंडिया मोहिमेमुळे यूपीआय, क्यूआर कोड आणि ऑनलाइन पेमेंटचा वापर वाढला असला तरी सर्वच प्रवासी या सुविधांचा वापर करत नाहीत. विशेषतः जेष्ठ नागरिक अजूनही रोख व्यवहारावर अवलंबून आहेत. त्यामुळे सुट्ट्या पैशांचा प्रश्न अधिकच प्रकर्षाने जाणवतो.



तिकीट दरवाढीनंतर बहुतेक दर एक-दोन रुपयांच्या फरकात असल्याने प्रत्येक व्यवहारात सुट्ट्या पैशांची गरज निर्माण होते. यामुळे किरकोळ कारणांवरून प्रवासी-वाहकांमध्ये तणाव निर्माण होत असल्याचे वास्तव आहे.

या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने तिकीट दर ‘राऊंड फिगर’मध्ये ठेवण्याचा विचार करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. तसेच वाहकांना पुरेशा प्रमाणात सुट्टे पैसे उपलब्ध करून देणे, डिजिटल व्यवहार सुविधा टप्प्याटप्प्याने वाढवणे आणि प्रवाशांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

ऑनलाईनच्या युगातही एक-दोन रुपयांसाठी होणारी तुतुमैमै थांबवायची असेल, तर तिकीट दरातील विसंगती दूर करून सर्वसमावेशक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## उमरग्यात संघ शताब्दीनिमित्त प्रमुख नागरिक संगोष्ठी; विचारांची मांडणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ मे -**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त उमरगा शहरात प्रमुख नागरिक संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले. डिग्गी रोडवरील कन्हैया मंगल कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या संगोष्ठीत पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांनी मुख्य वक्ते म्हणून मार्गदर्शन केले, तर जिल्हा कार्यवाह अजय जानराव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. भाडेसिया यांनी संघाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश



टाकताना इदं न मम हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र असल्याचे सांगितले. निस्वार्थ भावना, त्याग आणि समर्पणातून समाजकार्य घडते, असे त्यांनी नमूद केले. संघाचे कार्य भारताला विश्वगुरू बनवण्याच्या उद्देशाने सुरू असून शिस्त आणि कार्यपद्धतीमुळे संघाची वेगळी ओळख निर्माण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

व्यक्ती निर्माण हा संघाच्या कार्याचा केंद्रबिंदू असल्याचे सांगत त्यांनी डॉ. हेडगेवार यांच्या विचारांचा उल्लेख केला. ज्ञान, आध्यात्म, सेवा आणि साधना या मूल्यांमुळे स्वयंसेवकाचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते, असे ते म्हणाले.

संघाच्या प्रार्थनेचे महत्त्व सांगताना त्यांनी भारतमातेप्रती समर्पणाचा भाव अधोरेखित केला. भगवा ध्वज हा संघाचा गुरु मानला जातो आणि स्वयंसेवक प्रसिद्धीपेक्षा समाजातील समस्या सोडवण्यावर भर देतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. उपस्थित नागरिकांनीही चर्चेत सक्रिय सहभाग नोंदवला.

हा उपक्रम उमरगा शहरात संघाच्या विचारांचा प्रसार आणि समाजजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा ८९.६३ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.४ मे -**
शंकरराव पाटील कनिष्ठ (स्वतंत्र) महाविद्यालय, भुम येथील इयत्ता १२ वी (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षेचा निकाल २०२५-२६ जाहीर झाला असून महाविद्यालयाने ८९.६३ टक्के असा उल्लेखनीय निकाल नोंदवला आहे.

या निकालात विज्ञान शाखेचा निकाल ९८.४४%, वाणिज्य शाखेचा ९६.८२% तर कला शाखेचा ७७.९४% इतका लागला असून सर्व शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी समाधानकारक यश संपादन केले आहे. कला शाखा (१२ वी) : प्रथम सलमा शब्बीर शेख (८०.१७%), द्वितीय श्रद्धा दादा गणगे (७९.८३%), तृतीय रानिया साहेबराव अंघोरे (७४.३३%). विज्ञान शाखा (१२ वी) : प्रथम श्रावणी विशाल पंडित (६९.३३%), द्वितीय रीना अंकुश उबाळे (६५.६७%), तृतीय अस्मिता अमित गोसावी (६१.८३%). वाणिज्य शाखा (१२ वी) : प्रथम प्रणाली दत्ता जाधव (८८.५०%), द्वितीय धनश्री अशोक रुणे (७१.१७%), तृतीय मानसी सुनील टकले (७०.६७%).

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## घरात घुसून महिलेवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

तालुक्यातील एका गावात २७ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला (नाव व गाव गोपनीय) ही दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास घरी असताना, त्याच गावातील एका तरुणाने तिच्या घरात येऊन तिचे दोन्ही हात घट्ट पकडत जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

या प्रकरणी पीडितेने दि.२ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आंबी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### भुम येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**भूम, दि.४ मे -**

भुम येथील शंकरराव पाटील कनिष्ठ (स्वतंत्र) महाविद्यालयात इयत्ता १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष शिंदे होते. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतील विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या मेहनतीसह पालक व शिक्षकांना दिले. कार्यक्रमास प्रा. रामेश्वर सोळंके, प्रा. नंदकुमार जगदाळे, डॉ. राजश्री तावरे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन गंगाधर काळे यांनी केले, तर आभार प्रा. बालाजी माळी यांनी मानले.



### अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी भूममध्ये निषेध

**भूम, दि.४ मे -**

नरसापूर (जि. पुणे) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटनेचा भूम तालुका ब्राम्हण संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. सकाळी ११ वाजता तालुक्यातील युवक, ज्येष्ठ नागरिक व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत निषेध नोंदविला. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनात प्रकरणाची निष्पक्ष व जलद चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करावी, खटला जलदगती न्यायालयात चालवावा, पीडित कुटुंबास आर्थिक व मानसिक मदत द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या. मागण्या मान्य न झाल्यास रस्ता रोको आंदोलनाचा इशाराही देण्यात आला. यावेळी हभप. अरुण शाळु महाराज, विलास शाळु, ए.पी. देशपांडे, सुधीर देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.



### ईट शाळेत प्रवेशोत्सव; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**भूम, दि.४ मे -**

पी.एम. श्री जिल्हा परिषद प्रशाला ईट येथे प्रवेशोत्सव तसेच एनएमएमएस शिष्यवृत्ती व नवोदय निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. एनएमएमएस शिष्यवृत्ती मिळवलेल्या विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षकांचा गौरव करण्यात आला. तसेच नवोदयसाठी निवड झालेल्या आदित्य महामुनी व सुजता महामुनी यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक जयराम कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन नारायण सपकाळ यांनी केले, तर आभार लक्ष्मीकांत चव्हाण यांनी मानले.

### अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात आज बैठक

**धाराशिव, दि.४ मे -**

अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याच्या उद्देशाने राज्य सरकार उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबवत असल्याचा आरोप बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांनी केला आहे. न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या अहवालाच्या आधारे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न संविधानविरोधी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर पुढील धोरण ठरविण्यासाठी मंगळवार, दि.५ मे रोजी धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस अनुसूचित जातीतील सर्व घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागास समाजाच्या विकासासाठी केलेल्या तरतुदींमध्ये बदल करण्याचा अधिकार केवळ केंद्र सरकारला असल्याचेही धनंजय नाना शिंगाडे यांनी स्पष्ट केले.

### वाहतूक नियमभंगावर ३२६ कारवाया

**धाराशिव, दि.४ मे -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवत मोटार वाहन कायदा भंग प्रकरणी ३२६ कारवाया केल्या. या कारवाईतून एकूण २ लाख ८९ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## भूम नगरपरिषदेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पाला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.४ मे -**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी भूम नगरपरिषदेकडून सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पास जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार यांनी अंतिम मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच संबंधित लेखा संहितेनुसार ही मंजुरी देण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषद प्रशासनाने तयार केलेल्या अर्थसंकल्पास यापूर्वी प्रशासकीय सभेच्या ठरावाद्वारे मान्यता देण्यात आली होती. या अर्थसंकल्पात सुमारे १९५.५२ कोटी रुपयांचे उत्पन्न गृहित धरले असून ३.६६ लाख रुपयांची शिल्लक दर्शविण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी देताना काही अटी व शर्ती लागू केल्या असून त्यांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. अर्थसंकल्पानुसार नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे वेतन राखीव निधीतून नियमानुसार व वेळेत अदा करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच वेतनासाठी राखीव निधी इतर कारणांसाठी वापरता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय दुर्बल घटक कल्याण, महिला व बालकल्याण आणि दिव्यांग कल्याणासाठी प्रत्येकी ५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून ती रक्कम संबंधित आर्थिक वर्षातच खर्च करणे आवश्यक आहे. साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. विकासकामे राबविताना उपलब्ध निधी, उत्पन्नवाढ आणि खर्च नियंत्रण यामध्ये समतोल राखण्यावर भर देण्याचे आदेशात नमूद आहे. तसेच निधीचा पारदर्शक व योग्य वापर करून शहरातील विकासकामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या मंजुरीमुळे भूम शहरातील पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याण योजना आणि विविध विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. नगराध्यक्ष संयोगिता संजय गाढवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.




## धाराशिव शहरात घरफोडी; १.९३ लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

शहरातील विकासनगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बाळासाहेब गंगाधर पाटील (वय ६३, रा. रायगड फंक्शन हॉल मागे, विकासनगर, धाराशिव) हे व त्यांचे सहकारी योगेश फुलसे कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. याचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने दि. २४ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११ ते दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

चोरट्यांनी घरातील सुमारे ६९ ग्रॅम सोन्याचे व ५० ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ९३ हजार ७६० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी बाळासाहेब पाटील यांनी दि. ३ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## २०११ पूर्वीच्या अतिक्रमणांना नियमितीकरणाचा दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मे -**

शासनाने २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याने नळदुर्ग शहरातील शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. वसंतनगर, इंदिरानगर, बुद्धनगर आणि भीमनगर परिसरातील अनेक रहिवाशांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

गरीब कुटुंबांच्या निवासाचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे ठराविक अटी व शर्तीवर नियमित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार १ जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जाणार आहेत.

### नळदुर्गातील शेकडो कुटुंबांना फायदा

ही सवलत केवळ निवासी वापरासाठी मर्यादित असून व्यावसायिक अतिक्रमणांना या योजनेत स्थान देण्यात आलेले नाही. तसेच सार्वजनिक रस्ते, नाले, वनक्षेत्र, जलस्रोत, धोकादायक क्षेत्रे व शासकीय आरक्षित जागांवरील अतिक्रमणे नियमित केली जाणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

अतिक्रमण नियमित करण्यासाठी मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, नगरपालिकेतील ८-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही व घराचे छायाचित्र आदी पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. एका कुटुंबाला राज्यात फक्त एकच अतिक्रमण नियमित करता येणार असून त्यासाठी शपथपत्र देणे बंधनकारक आहे. तसेच नियमित केलेली जागा पाच वर्षांपर्यंत विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी निर्धारित कालावधीत नळदुर्ग नगरपालिका कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले आहे. तसेच सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी नगरपालिका प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिक्रमणे नियमित झाल्यानंतर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेचा लाभही मिळणार आहे. योजनेनुसार ५०० चौरस फुटांपर्यंत अतिक्रमण विना शुल्क नियमित केले जाणार असून त्यापुढे १५०० चौरस फुटांपर्यंत शुल्क आकारले जाणार आहे.

## बारावीचा निकाल जाहीर; धाराशिव जिल्ह्यात मुलींची पुन्हा बाजी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून धाराशिव जिल्ह्यात यंदाही मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत मुलांपेक्षा सरस ठरल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांमध्ये समाधानकारक निकाल लागला असून जिल्ह्याचा एकूण निकाल ८८.५९ टक्के नोंदवण्यात आला आहे.

दुपारी १ वाजता निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांसह पालकांनी आनंद व्यक्त करत जल्लोष साजरा केला. शहरासह ग्रामीण भागातील मिठाईच्या दुकानांमध्ये पेढ्यांसाठी गर्दी दिसून आली. काही विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने निराशेचे वातावरणही काही ठिकाणी दिसून आले. विज्ञान शाखा : ८४११ पैकी ८३६३ विद्यार्थी परीक्षेला बसले, त्यापैकी ८०४४ उत्तीर्ण (९६.१८%). मुली - ९७.९५%, मुले - ९४.४४% वाणिज्य शाखा : १४१८ पैकी १३९५ विद्यार्थी बसले, ११८८ उत्तीर्ण (८५.१६%). मुली - ९१.५८%, मुले - ८०.०५% कला शाखा : ५५३१ पैकी ५३५३ विद्यार्थी बसले, ४१८८ उत्तीर्ण (७८.२३%). मुली - ८८.३४%, मुले - ७०.७१%. जिल्ह्यात एकूण १५,९९० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,७१५ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि १३,९२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलांचा निकाल ८३.९४% तर मुलींचा ९४.१७% इतका नोंदवला गेला आहे.

धाराशिव तालुका ९१.६९% निकालासह अव्वल ठरला. त्यापाठोपाठ भूम (९०.८०%), कळंब (९०.२५%) आणि परंडा (८७.३०%) या तालुक्यांनी चांगली कामगिरी केली. लोहरा तालुक्याचा निकाल ७७.६६% राहिला.

यंदाच्या निकालात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही चांगली कामगिरी केली आहे. शिक्षणाबाबत वाढती जागरूकता, पालकांचा सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे यशाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

## नळदुर्ग-जळकोट महामार्गावरील खड्ड्यांनी घेतला जीवघेणा आकार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ मे -**

नळदुर्ग ते जळकोट दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने हा मार्ग सध्या प्रवासी व वाहनचालकांसाठी अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' ठरत आहे. या खड्ड्यांमुळे प्रवास करताना वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे.

महामार्गाची दुरवस्था झालेली असतानाही संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विशेषतः नळदुर्गजवळील मशीद परिसर व जुन्या नाक्याजवळ मोठ्या प्रमाणात जीवघेणे खड्डे पडले आहेत.

खड्डे बुजविण्यासाठी सुमारे महिनाभरापूर्वी संबंधित विभागाने रस्त्यालगत खडी व डस्ट टाकून ठेवली आहे. मात्र प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम अद्याप सुरू झालेले नाही. उलट या खडी व डस्टच्या ढिगांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या ढिसाळ कारभारामुळे वाहनचालक त्रस्त झाले असून, संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## उमरगा तहसीलमध्ये आज विशेष शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ मे -**

संजय गांधी निराधार अनुदान व श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांचे आधार अपडेट न झाल्याने अनुदान मिळण्यात अडचणी येत आहेत. तसेच काही दिव्यांग लाभार्थ्यांकडे णऊखऊ प्रमाणपत्र नसल्याची बाब समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर उमरगा तहसील कार्यालयात दि. ५ मे २०२६ रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आधार अपडेशन व णऊखऊ व्हेरिफिकेशनची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरास उपस्थित राहून प्रलंबित कामे पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन नायब तहसिलदार भिमाशंकर बेरुळे यांनी केले आहे. तसेच लोकप्रतिनिधींनीही जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा; तीन वर्षांतील २७ शिक्षकांचा गौरव




**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.४ मे -**

भूम तालुक्यातील पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा शुक्रवार दि.१ मे रोजी पंचायत समिती सभागृहात पार पडला.

मागील तीन वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती गठीत नसल्यामुळे प्रलंबित राहिलेले पुरस्कार यंदा एकत्रितपणे वितरित करण्यात आले. सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या तीन वर्षांतील एकूण २७ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. गटविकास अधिकारी एल.आर. वाझे, गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी, विस्तार अधिकारी अनिता जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती पूजा ढगे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपसभापती प्रियंका रणबागुल, जिल्हा परिषद सदस्य विजयमाला मारकड, जयश्री काळे पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे, कृष्णा गोयकर, प्रशांत मुंडेकर, मनोज अंधारे, प्रदीप शेळके, युवराज गटकळ, भाऊसाहेब मारकड उपस्थित होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे विशाल ढगे, अर्जुन गुंजाळ, तसेच शिक्षक संघटनांचे अध्यक्ष संजीवन तांबे, अभिमन्यू निकम, बाजीराव अहिरे, जयराम कचरे, पोपट बोराडे यांच्यासह तालुक्यातील शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

या सोहळ्यामुळे शिक्षकांच्या कार्याला दाद मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

### विज्ञान प्रदर्शन व शाळांचा गौरव

तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात देशभूषण कुलभूषण विद्यालय प्रथम, जिल्हा परिषद प्रशाला पाटसांगवी द्वितीय तर अंतरगाव विद्यालय, अंतरगाव तृतीय क्रमांकाने सन्मानित झाले. तसेच 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' उपक्रमांतर्गतही काही शाळांचा गौरव करण्यात आला.

### आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते

सन २०२२-२०२३ : गिरी सविता, इंटकर हरिचंद्र, औढकर विलास, आगळे जीवन, खराडे रेखा, काझी शाहीन, घोळवे सुभाष, गव्हाणे दत्तू, गजरे मनोहर. सन २०२३-२०२४ : सोमनाथ तौर, कोकाटे वनिता, दत्तात्रय गुंजाळ, ठोकळे संभाजी, संगीता शिंदे, नाईकवाडे अनिता, शिराळकर बाळकृष्ण, गरड शैलेश, संतोष मेंढेकर. सन २०२४-२०२५ : लाड सुमित्रा, सुरवसे प्रमोदिनी, खोसे अर्चना, पोतरे माधव, भगत प्रमोद, आगलावे यशवंत, तांबोळी शरीफ, पवार रामहरी, पाटील वर्षा.

## काक्रंबा उड्डाणपुलाजवळ भीषण अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

काक्रंबा परिसरात एनएच ३६१ मार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तुकाराम वसंत ढेकरे (वय ३५, रा. काक्रंबा, ता. तुळजापूर) हे दि.१० एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता मोटरसायकल (क्र. एमएच २५ ५०४६) वरून एनएच ३६१ मार्गावर काक्रंबा उड्डाणपुलाजवळून जात होते.



दरम्यान, चारचाकी वाहन (क्र. एमएच १३ डीक्यु ५३०६) चालक विनोद भारत कोळी (रा. मनगोळी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) याने आपल्या ताब्यातील कार ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व चुकीच्या दिशेने चालवत समोरून दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात तुकाराम ढेकरे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी योगिता तुकाराम ढेकरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.२ मे २०२६ रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास तुळजापूर पोलीस करत आहेत.

**जाहिर प्रगटन**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र.९१९/२०२६**

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **हणमंत नागनाथ सुरवसे रा. धनगरवाडी ता. तुळजापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची मुलगी नामे **नम्रता हणमंत सुरवसे** यांचा **जन्म दिनांक ०७.०५.२०१०** रोजी धनगरवाडी येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.**

शिक्का
तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**नायब तहसिलदार (महसुल),**
**तहसिल कार्यालय, तुळजापुर**

